# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.06.2026** **वारःमंगळवार**

---

1. पेट्रोल आणि डिझेलच्या विक्री आणि वितरणावरील तात्पुरते निर्बंध उद्यापासून मागे
2. पश्चिम बंगालमध्ये 'समान नागरी कायदा' लागू करण्याचा राज्य सरकारचा निर्णय
3. चित्रपट उद्योगाच्या वाढीसाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयाकडून उच्चस्तरीय अभ्यास गटाची स्थापना. चित्रपटविषयक पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी आदर्श नियमावलीही तयार
4. महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील नसरापूर इथल्या बालिका अत्याचार आणि हत्या प्रकरणी दोषी भीमराव कांबळे याला फाशीची शिक्षा आणि
5. फिफा विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत ब्राझीलचा जपानवर 2-1 असा विजय

**पेट्रोल निर्बंध**

पेट्रोल आणि डिझेलच्या विक्री आणि वितरणावरील तात्पुरत्या नियामक उपाययोजना मागं घेण्याचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. उद्या म्हणजे एक जुलैपासून सार्वजनिक तेल कंपन्यांच्या विक्री केंद्रांवर आधीचे निर्बंध लागू होणार नाहीत, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयानं एका निवेदनाद्वारे जाहीर केलं आहे. पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे सर्वसामान्य नागरिकांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतल्या कच्च्या तेलाच्या वाढत्या भावांपासून वाचवण्यासाठी वितरणविषयक निर्बंध लागू करण्यात आले होते. या महिन्याच्या बारा तारखेपासून पेट्रोल उच्च क्षमतेच्या डिझेल खरेदीसाठी प्रति व्यक्ती दोनशे लिटरपर्यंतची मर्यादा लागू करण्यात आली होती. इंधनाचा काळा बाजार होऊ नये यासाठी हे पाऊल उचलण्यात आलं होतं. मात्र, आता इंधन साठ्याच्या पुरवठ्याचा आढावा घेतल्यानंतर हे निर्बंध सरकारनं हटवले आहेत. या निर्बंधांमुळं देशभरात पेट्रोल आणि डिझेलची पुरेशी उपलब्धता होऊ शकली आणि सर्वसामान्य ग्राहकांच्या हिताचं रक्षण झालं असं असं पेट्रोलियम मंत्रालयानं म्हटलं आहे.

**प.बंगाल-यूसीसी**

पश्चिम बंगाल सरकारने राज्यात 'समान नागरी कायदा' लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री सुवेन्दू अधिकारी यांनी काल विधानसभेत ही घोषणा केली. 2 जुलैला होणाऱ्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या विधेयकाचा मसुदा सादर करण्यात येईल असं ते म्हणाले. या कायद्याची रूपरेषा तयार करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रंजना देसाई यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली असून, ही समिती, विवाह, घटस्फोट, दत्तकविधान यासारख्या नऊ बाबींचा विचार करून अहवाल सादर करेल. मात्र, अनुसूचित जमातीतील आदिवासी, कुर्मी आणि प्राचीन मूळ निवासी समुदयांना या कायद्याच्या कक्षेतून बाहेर ठेवले जाईल, असं मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केलं.

**चित्रपट उद्योग**

चित्रपट उद्योगाच्या वाढीसाठी माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं दोन महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मंत्रालयाने एका उच्चस्तरीय अभ्यास गटाची स्थापना केली असून चित्रपटविषयक पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी आदर्श नियमावलीही तयार करण्यात आली आहे. नवी दिल्ली केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उच्चस्तरीय आढावा बैठकीत काल हे निर्णय घेण्यात आले. मंत्रालयानं एका उच्चस्तरीय

अभ्यास गटाची स्थापना केली असून प्रसारभारतीचे अध्यक्ष प्रसून जोशी या गटाचे अध्यक्ष असतील. या गटात उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील भागीदार यांचाही समावेश असेल. हा गट भारतीय चित्रपट उद्योगासमोरील संधी आणि आव्हानांचा अभ्यास करेल. तसंच, या क्षेत्राला बळकटी देण्याचे उपायही सुचवणार आहे. तीन महिन्यांच्या आत मंत्रालयाला अहवाल सादर करण्यात येणार आहे. चित्रपटविषयक पायाभूत सुविधांच्या विकासाला गती देण्यासाठी, मंत्रालयाने आदर्श नियमावली तयार केली आहे. हे 'आदर्श राज्य चित्रपट नियम' सर्व राज्य सरकारांकडे पाठवले आहेत. राज्यांना हे नियम स्वीकारण्याची विनंती करण्यात आली आहे.

**अमरनाथ यात्रा**

येत्या 3 जुलैपासून अमरनाथ यात्रेला प्रारंभ होत आहे. भाविकांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी यात्रेच्या मार्गावरील पंजाब ते जम्मू -काश्मीरपर्यंत कडक सुरक्षाव्यवस्था तैनात करण्यात आली आहे. लांब पल्ल्यापर्यंत नजर ठेवू शकणारे अत्याधुनिक कॅमेरे बसवण्यात आले असून, जम्मू पोलिसांची 'थर्ड आय' ही पाळत ठेवण्यासाठीची यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. आणीबाणीच्या काळात काय उपाययोजना कराव्यात यासाठी सुरक्षा दलांनी सराव केला.

**नसरापूर निकाल**

महाराष्ट्रातील पुणे जिल्ह्यातील नसरापूर इथं साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिची हत्या केल्याप्रकरणी दोषी भीमराव कांबळे याला विशेष न्यायालयानं काल फाशीची शिक्षा सुनावली. पुणे जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी हा निर्णय दिला. या प्रकरणात आरोपीने केलेला गुन्हा अत्यंत क्रूर, अमानुष आणि 'दुर्मीळातील दुर्मीळ' स्वरूपाचा असल्याचं न्यायालयानं नमूद केलं. पुणे ग्रामीण पोलिसांनी या प्रकरणाचा तपास वेगाने पूर्ण करून अवघ्या 15 दिवसांत सुमारे बाराशे पानांचं दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केलं होतं. गुन्हा दाखल झाल्यापासून 58 दिवसांत निर्णय देण्यात आल्यामुळे हा महाराष्ट्रातला सर्वात वेगवान खटला ठरला आहे.

**मुर्मू दौरा**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवसांच्या आंध्र प्रदेश दौऱ्यावर आहेत. आज राष्ट्रपती विजयनगरम इथल्या केंद्रीय आदिवासी विद्यापीठाच्या पहिल्या पदवीप्रदान सोहळ्यासाठी उपस्थित राहतील. उद्या राष्ट्रपती अनंतपुरमू इथल्या केंद्रीय विद्यापीठाच्याही पहिल्या पदवीप्रदान सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

**शौर्य पुरस्कार**

नवी दिल्ली इथं राष्ट्रपती भवनात झालेल्या संरक्षण सेवा पुरस्कार वितरण सोहळ्याच्या दुसऱ्या टप्प्यात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते काल सैन्य दलातील कर्तबगार अधिकाऱ्यांना शौर्य पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं. तिन्ही सैन्य दलं, केंद्रीय पोलीस दलांसह अन्य संरक्षण संस्थांमध्ये सेवा बजावताना धाडसी कामगिरी करून शौर्याचं दर्शन घडवणाऱ्या कर्मचाऱ्यांना हे पुरस्कार देऊन गौरवण्यात येतं. उपराष्ट्रपती सी.पी राधाकृष्णन, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, अन्य केंद्रीय मंत्री आणि सुरक्षा दलांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

**भारत निषेध**

पाकिस्ताननं अफगाणिस्तानवर केलेल्या हवाई हल्ल्यांचा भारतानं तीव्र निषेध नोंदवला आहे. या हल्ल्यात महिला आणि लहान मुलांसह अनेक सर्वसामान्य नागरिकांचा मृत्यू झाला आहे. पाकिस्ताननं केलेले हे हल्ले म्हणजे अफगाणिस्तानच्या सार्वभौमत्वावर हल्ला असून या भागातली शांतता आणि स्थैर्य यांना थेट धोका असल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं म्हटलं आहे. पाकिस्तानचं सातत्यपूर्ण बेपर्वा वागणं यातून दिसतं आणि आपलं अंतर्गत अपयश झाकण्यासाठी आपल्या सीमापलींकडे हिंसाचार पसरवण्याचा प्रयत्न दिसतो असंही भारतानं स्पष्टपणे म्हटलं आहे.

अफगाणिस्तानची सार्वभौमिकता आणि प्रादेशिक अखंडता यांना आपला पाठिंबा असल्याचा पुनरुच्चार भारतानं केला आहे. दरम्यान, चीनच्या लष्करानं अरुणाचल प्रदेशमध्ये अतिक्रमण करून आपले तळ उभारल्याच्या वृत्ताचं भारतीय लष्करानं खंडन केलं आहे. याबाबतच्या बातम्या चुकीच्या आहेत आणि त्यांना कोणताही आधार नसल्याचं स्पष्टीकरण लष्करानं दिलं आहे.

**अमेरिका चर्चा**

अमेरिका आणि इराणमध्ये आज हॉर्मुझच्या सामुद्रधुनीबाबतच्या वादासंदर्भात कतारची राजधानी दोहा इथं चर्चा होणार आहे. या सामुद्रधुनीच्या माध्यमातून जगातील वीस टक्के कच्च्या तेलाची वाहतूक होते. मात्र, गुरुवारपासून दोन्ही बाजूंकडून सुरू असलेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यांमुळे वाहतुकीला पुन्हा खीळ बसली आहे. काल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी हल्ले वाढवण्याची धमकी दिल्यानंतर अमेरिकी आणि इराणी अधिकाऱ्यांनी तात्पुरता संघर्षविराम करण्यास सहमती दाखवली आहे.

**सेनेगल सुधारणा**

सेनेगलच्या संसदेनं आपले अधिकार वाढवण्याची आणि अध्यक्षांचे अधिकार कमी करण्याचा वादग्रस्त घटनात्मक सुधारणा मंजूर केली आहे. मात्र, सरकारनं याबाबत सार्वमत घेतलं जाईल, अशी भूमिका घेतली आहे. बडतर्फ करण्यात आलेले माजी पंतप्रधान औस्माने सोंको हे गेल्या महिन्यात संसदेचे प्रमुख झाल्यानंतर अध्यक्ष बासिरोऊ दिओमाये आणि सोंको यांच्यात राजकीय मतभेद वाढले आहेत. सोंको राजकीय सूड उगवत असल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे.

**दिल्ली-इलेक्ट्रिक धोरण**

दिल्ली सरकारनं दिल्ली इलेक्ट्रिक वाहन धोरण मंजूर केलं आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी पंधरा हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. 31 मार्च 2030 पर्यंत राजधानी उत्सर्जनमुक्त करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं आहे, अशी माहिती दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी काल दिली. पुढच्या चार वर्षांमध्ये टप्प्याटप्प्यानं ही योजना राबवण्यात येणार आहे. त्यासाठी आठ हजार कोटी रुपये खर्चून इलेक्ट्रिक वाहन पायाभूत सुविधा तयार करण्यात येणार आहेत आणि या वाहनांना विविध करांमधून सवलत देण्यात येणार आहे, असं रेखा गुप्ता यांनी स्पष्ट केलं.

**ड्रोन**

भारताच्या दिशेनं बेकायदा अमली पदार्थ घेऊन जाणारं एक ड्रोन पाकिस्तानमधील पंजाब प्रांताजवळ शनिवारी कोसळलं. भारत-पाकिस्तान सीमेपासून आठ किलोमीटर अंतरावरील नारंग मंडी भागात ही घटना घडल्याचं पाकिस्तानच्या पोलिसांनी म्हटलं आहे. हे ड्रोन पाच किलो हेरॉईन घेऊन जात असल्याचं स्पष्ट झालं आहे. या प्रकरणी अजून कोणालाही अटक करण्यात आलेली नाही.

**फिफा चषक**

फिफा विश्वकरंडक फुटबॉल स्पर्धेत काल, अमेरिकेतील टेक्सासमध्ये झालेल्या, 'राऊंड ऑफ थर्टी टू' च्या सामन्यात ब्राझीलने जपानवर 2-1 असा विजय मिळवला. ब्राझीलच्या गॅब्रिएल मार्टिनेलीने 'इंज्युरी टाइम' अर्थात, सामन्याच्या निर्धारित वेळेनंतरच्या अतिरिक्त वेळेच्या अगदी शेवटी विजयी गोल केला. दुसऱ्या एका सामन्यात पॅराग्वेनं जर्मनीवर 4-3 असा विजय मिळवला.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**